# ४. अहो आला पहा देव आला

अहो आला पहा देव आला, पहा प्रभु आला ।
अवतार आला, या हो या हो चला दर्शनाला ॥धृ.॥

ज्याच्या भेटीसाठी जन्म कोटी ।
ऋषी मुनी करिती खटपटी ।
ध्यान लावूनिया गिरीकपाटी ।
विना कष्ट भेटण्या आला ॥१॥

कसे सांगू हाचि तो देव ।
जीव तुटतो पाहुनि संदेह ।
जळो जळो वृथा हा मोह ।
धांवा हाचि पांडुरंग आला ॥२॥

Scanned by CamScanner

जरी नाही आता धांवणार ।
देव नाही वाट पाहणार ।
पश्चात्ताप पुढे होणार ।
सत्य जेव्हां कळेल जगाला ॥३॥

ऐका जीवन ही एक जुगार ।
एका जन्माची काय फिकीर ।
कोटि जन्मात एक लावा डावावर ।
'मधुसूदन' हो दैवी हवाला ॥४॥

Scanned by CamScanner